**कृपया प्रसिध्दीसाठी** **22 एप्रिल 2009**

## राम नाईक यांना मिळत आहे रेल्वे प्रवाशांचे समर्थन

**मुंबई, बुधवार :** मुंबईचे रेल्वे प्रवासी जाणतात की त्यांचा रेल्वे प्रवास व सुखकारक करणारा कोणी असेल तर ते आहेत फक्त राम नाईक. म्हणूनच आपल्या निवडणूक प्रचाराच्या तिस-या टप्प्यात उत्तर मुंबई मतदार संघातील भाजपा-शिवसेना युतीचे उमेदवार श्री. राम नाईक जेव्हा काल प्रचारासाठी मालाड रेल्वे स्थानकात पोहचले तेव्हा थकून घरी परतणा-या प्रवाशांमध्ये उत्साहाची लाट पसरली.

श्री. राम नाईक म्हणजे,"बोले तैसा चाले" असल्याने निवडणूक जिंकल्यानंतर उपनगरी रेल्वे प्रवाशांना सुविधा देण्याचे काम प्राथमिकतेने करण्याचे वचन देणा-या श्री. राम नाईक यांना मालाड रेल्वे स्थानकावर बघून प्रवाशांना आनंद झाला. सर्व प्रथम श्री. राम नाईक यांचे कमळ देऊन स्वागत केले ते हमालांनी. उत्तर मुंबईतील हमालांची संघटना आणि पतपेढी सुरु करण्यामध्ये श्री. राम नाईक यांचा पुढाकार असल्याने नेहमीच त्यांच्या निवडणूक प्रचारात हमाल बंधू सहभागी होतात. परंतु यावेळी त्यांच्यात वेगळाच उत्साह जाणवला. श्री. लालू प्रसाद यांनी दोन वर्षापूर्वी रेल्वे बजेटच्या वेळी हमालांना नोकरीचे अमिष दाखविले होते की सगळे हमाल आनंदी झाले होते. परंतु अजूनही त्या नोकरीचा पत्ता नसल्याने कॉंग्रेस सरकारला धडा शिकविण्याची हमालांची इच्छा आहे.

दुसरीकडे रेल्वे प्रवासीही श्री. राम नाईक यांच्या जवळ जाऊन हस्तांदोलन करुन त्यांना आश्‍वस्त करीत होते की ते फक्त राम नाईक यांनाच जिंकून आणणार कारण, त्यांना हवा आहे सुखकर रेल्वे प्रवास! श्री. राम नाईक जिंकून यावेत अशी इच्छा करणा-या स्त्रियाही शेकडो आहेत. एरवी दिवसभर नोकरी करुन आपल्या घराकडे रोज संध्याकाळी धावत घरी जाणा-या महिलाही काल मालाड रेल्वे स्थानकावर थांबल्या. एकीने श्री. राम नाईक यांना सांगितले की आपण होता म्हणून आम्हाला खास महिला(लेडीज स्पेशल) गाडी मिळाली, आता आम्ही तुम्हालाच जिंकून आणणार कारण आम्हाला अजूनही खास महिला गाडयांची गरज आहे. एका भाजी विकणा-या बाईने विचारले की राम नाईक फक्त तुम्हालाच कसं समजलं की आम्हाला सामानाच्या (लगेज) डब्याची गरज आहे ? मागील पाच वर्षात आणखी कुणालाच वाटले नाही की आम्हीही रेल्वे प्रवासी आहोत. आमच्याही काही मागण्या आहेत. एका तरुणीने तर त्यांना शुभेच्छा देताना गुलाबाचे फूल दिले तेव्हा श्री. राम नाईक यांचा चेहराही त्या गुलाबासारखाच खुलला.

भाजपा-शिवसेना प्रचाराचा तिसरा टप्पा काल पासून उत्तर मुंबईत सुरु झाला. या टप्प्यात घरी परत येणा-या रेल्वे प्रवाश्यांची वेगवेगळया रेल्वे स्थानकांवर जाऊन श्री. राम नाईक भेट घेणार आहेत. या तिस-या टप्प्याचा प्रारंभ काल मालाड रेल्वे स्थानकापासून झाला. त्यावेळी रेल्वे प्रवासी मतदारांशी संपर्क साधताना श्री. राम नाईक म्हणाले,"उपनगरी रेल्वे प्रवाश्यांच्या समस्यांना मी सर्वात जास्त महत्त्व देत आलो आहे आणि पुढेही देईन. मी रेल्वे राज्य मंत्री असताना मुंबई रेल्वे विकास महामंडळ बनवून मुंबईसाठी एमयुटीपी-एकच्या माध्यमातून रु. 4,500 कोटी च्या योजनांना प्रारंभ केला. परंतु श्री. लालू प्रसाद यांनी या सगळया योजनांची गती मंदावली. गेल्या वर्षी रेल्वे बजेट मध्ये रु. 6,300 कोटीच्या एमयुटीपी-दोनच्या योजनेची घोषणा केली, परंतु त्यामध्येही फक्त रु. 10 कोटी खर्च केले गेले. मी मतदारांना वचन देतो की निवडणूक जिंकल्यानंतर या दोन्ही योजना पूर्ण करण्याला सर्वाधिक प्राधान्य देईन."

**(विनोद शेलार)**
**प्रसिध्दी प्रमुख**
**मोबाईल क्र. 9867689540**